# सातारा जिल्हा परिषद,सातारा (ग्रामपंचायत विभाग)

**अत्यंत महत्वाचे**

जा.क्र./ग्राप-६/चौविआ/कावि//६११२/१६
दिनांक २४/०६/२०१६

प्रति,
गट विकास अधिकारी
पंचायत समिती (सर्व)---------------------

**विषय-१४ व्या वित्त आयोगातंर्गत जनरल बेसिक/परफॉर्मन्स ग्रँटच्या स्वरुपात सन २०१६/१७ ते सन २०१९/२० अखेर अंदाजे अपेक्षित उपलब्ध होणा-या निधीचे नियोजना बाबत.**

संदर्भ-१.ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.चौविआ-२०१५/प्र.क.२६/वित्त-४, दि.१६/७/१५.
२.ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. चौविआ-२०१५/प्र.क्र.६५/ वित्त-४, दि.२१/१२/२०१५.
३.ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. चौविआ-२०१५/प्र.क्र.२६/ वित्त-४, दि.२८/४/२०१६.
४.ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. चौविआ-२०१५/प्र.क्र.१०७/ वित्त-४, दि.०१/२/२०१६.
५.ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. चौविआ-२०१५/प्र.क्र.२३/ वित्त-४, दि.०१/२/२०१६.

वरील संदर्भीय विषयान्वये कळविणेत येते की,चौदाव्या वित्त आयोगाच्या दि.१ एप्रिल २०१५ ते दिनांक ३१ मार्च २०२० या पाच वर्षाच्या कालखंडात ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी निधी प्राप्त होणार आहे.प्रस्तूत निधी हा केवळ ग्रामपंचायत स्तरासाठीच उपलब्ध करण्यात येणार आहे.चौदाव्या केंद्रिय वित्त आयोगातंर्गत ग्रामपंचायतींना पाच वर्षात प्राप्त होणा-या एकूण निधीचे योग्य नियोजन होऊन निधीचा विनियोग अधिक प्रभावीपणे होणे गरजेचे आहे.तसेच पाच वर्षात अंदाजे उपलब्ध होणारा एकूण निधी विचारात घेऊन ग्रामपंचायतींना गावाच्या स्थानिक गरजाच्या आवश्यकतेनुसार गावाचा संपूर्ण विकास आराखडा तयार करताना नियोजन करणे सोईचे होईल व यामुळे ग्रामपंचायतींना शाश्वत विकासाचे उदिष्ट साध्य करण्यास मदत होईल.

सन २०१५/१६ ते सन २०१९/२० या आर्थिक वर्षात प्राप्त होणा-या निधीपैकी सन २०१५/१६ मध्ये प्राप्त झालेला निधी जनरल बेसिक ग्रँट ग्रामपंचायतींनाअलहिदा वितरीत करणेत आलेला आहे. सन २०१६/१७ ते सन २०१९/२० या चार वर्षाच्या कालावधीत चौदाव्या वित्त आयोगातंर्गत जनरल बेसिक/परफॉर्मन्स ग्रँटच्या स्वरुपात अंदाजे अपेक्षित उपलब्ध होणा-या निधीबाबत शासन स्तरावरुन आकडेवारी कळविणेत आलेली आहे.त्यानुसार शासन निर्णय दिनांक १६ जुलै २०१६ मधील मार्गदर्शक सुचनानुसार सन २०११ च्या जनगणनेनुसार ग्रामपंचायत ग्रामीण लोकसंख्येच्या प्रमाणात ९० टक्के व ग्रामीण क्षेत्रफळ (चौ.कि.मी) प्रमाणात १० टक्के असा एकूण १०० टक्के अंदाजे अपेक्षित उपलब्ध होणा-या निधीचे ग्रामपंचायत निहाय परिगणन करणेत आलेला असून ग्रामपंचायतींना चार वर्षाच्या कालावधीत अंदाजे अपेक्षित उपलब्ध होणा-या एकूण १०० टक्के निधीतून केवळ ९० टक्केचे निधीचा विनियोग शासन निर्णय दिनांक २१/१२/२०१६ मधील निधिचे विनियोग व संनियंत्रण घ्यावयाची कामांच्या प्राधान्यक्रमानुसार पायाभूत सुविधा प्रकल्पावर ग्रामपंचायतींनी गावातील आवश्यक गरजेवर आधारित नियोजन करुन चार वर्षाचे विकास आराखडे तयार करणेत यावे. तसेच सदर कामांची इतर योजनांबरोबर एककेंद्राभिमुखता राखली जाईल व मंजूर केलेल्या निधीपेक्षा जास्तीचे दायीत्व निर्माण होणार नाही. याबाबत पंचायत समिती स्तरावर सनियंत्रण

अधिकारी म्हणून आपली जबाबदारी असून याबाबत पंचायत समिती स्तरावरील समितीमार्फत नियोजित आराखडयातील कामे शिफारस करतांना दक्षता घ्यावी.उर्वरित १० टक्के निधी प्रशासकीय व तांत्रिक स्वरुपाच्या खर्चाच्या बाबींसाठी स्वतंत्र राखून त्याचे स्वतंत्र हिशोब ठेवणेबाबत सुचना दिलेल्या आहेत.सदरचे आराखडे तयार करताना शासन निर्णयात दिलेल्या तरतुदी नुसार करण्यात यावेत.

जिल्हा परिषद स्तरावरुन ग्रामपंचायतींना परफॉर्मन्स ग्रँटचे वाटप करताना सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे परफॉर्मन्स ग्रँट मिळण्यासाठी पात्र ठरण्यासाठी ग्रामपंचायतींनी खालीलप्रमाणे विहित १०० गुणांपैकी एकत्रित कमीत कमी ८५ गुण मिळविणे आवश्यक राहिल.

| | | |
|---|---|---|
| १ | ग्रामपंचायतीचे लेखा परिक्षण | ८० गुण |
| २ | ग्रामपंचायतीचे स्वउत्पन्नात वाढ<br>स्वउत्पन्नात वाढ १०% :- ५ गुण<br>स्वउत्पन्नात वाढ २५% :- १० गुण<br>स्वउत्पन्नात वाढ ५०% :- १५ गुण<br>स्वउत्पन्नात वाढ ५०% पेक्षा जास्त :- २० गुण | २०गुण |
| | एकुण | १०० गुण |

ज्या ग्रामपंचायतींनी परफॉर्मन्स ग्रँट मिळण्यासाठी पात्रता निकषांची पूर्तता केली नसेल,त्यांची संबंधित आर्थिक वर्षाच्या परफॉर्मन्स ग्रँटच्या हिश्श्याची रक्कम,पात्र ग्रामपंचायतींमध्ये समप्रमाणात वाटप करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तसेच शासन निर्णयात निधीचे विनियोगाबाबत व मार्गदर्शक सुचना काटेकोर अंमलबजावणी होईल याची दक्षता घेणत यावी. सोबत १४ वित्त आयोग जनरल बेसिक/ परफॉर्मन्स ग्रँटच्या सन २०१६-१७ ते २०१९/२० अखेर अंदाजे उपलब्ध होणा-या निधीचे ग्रामपंचायतनिहाय परिगणना तपशील ग्रामपंचायतींना चार वर्षात अंदाजे अपेक्षित किती निधी उपलब्ध होईल याबाबत ग्रामपंचायत निहाय यादी जोडलेली आहे.यामध्ये प्रत्यक्ष अनुदान प्राप्त होताना ५ ते १० टक्के निधी कमी जादा होण्याची शक्यता असून आपल्या विकास गटातील सर्व ग्रामपंचायतींना वरील प्रमाणे दिलेल्या सुचना व ग्रामपंचायतींना उपलब्ध होणा-या निधीबाबत लेखी कळवून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल उलट टपाली तात्काळ सादर करणेत यावा.

**सोबत- १४ वित्त आयोग जनरल बेसिक/ परफॉर्मन्स ग्रँटच्या सन २०१६-१७ ते २०१९/२० अखेर अंदाजे उपलब्ध होणा-या निधीचे ग्रामपंचायतनिहाय परिगणना तपशील**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**सातारा जिल्हा परिषद,सातारा**

**प्रतः-१.मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.सातारा यांना माहितीस्तव सविनय सादर.**
**२.मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जि.प.सातारा यांना माहितीसाठी.**